MHGA070008312023

| | |
|---|---|
| दाखल दिनांकः | १८.०९.२०२३ |
| नोंदणी दिनांकः | १८.०९.२०२३ |
| निकाल दिनांकः | ०२.०५.२०२६ |
| कालावधीः | ०२ ०७ १४ |
| | व. म. दि. |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी –** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **१५/२०२२**, पोलीस ठाणे, पेरमीली |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०२.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नियमीत फौजदारी खटला क्रमांक ९१/२०२३** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस स्टेशन पेरमीली |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **मंगेश पोटी मडावी,**<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय –मजुरी<br>राहणार – पीडीगुडम, ता.एटापल्ली,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **ॲड. श्री. बोगामी**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

---

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १७.१०.२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | १७.१०.२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १८.०९.२०२३ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १८.०९.२०२३ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १९.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपींबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंगेश पोटी मडावी | .. | १८.०९. २०२३ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ४५२ अन्वये | **निर्दोष** | - | - |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | रामजी देवू गावडे (**निशाणी २२**) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–२३**/स.सा.क्र.०१ | तोंडी रिपोर्ट वरिल सहिला |
| २. | निशाणी **पी–२४**/स.सा.क्र.०१ | छापिल प्रथम खबर वरिल सहिला |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १५/२०२२ | एक ओलसर काठी |

**न्यायनिर्णय**

(निकाल दिनांक : ०२ मे, २०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४,३२३, ५०४, ५०६ व ४५२ प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दि. १७.१०२.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता मौजा कचलेर येथून किराणा सामान घेवून जात असतांना गावातील चौकात आरोपी मंगे मडावी उभा होता. तेव्हा फिर्यादी त्याला म्हटले की, मामा तुला ०२ वर्षापुर्वी ६०० रूपये दिले होते ते मला परत दे, मला दुस–याला दयायाचे आहे असे

म्हटले असता मी, तुझे पैसे देत नाही, तुला काय करायचे आहे ते कर असे म्हणुन झगडा भांडण करून शिवीगाळ केली व अंगावर येवून पडून गालावर थापड मारली व पाठी मागुन ढकलुन दिले त्यामुळे त्यांचा उजवा पायाच्या टोंगळयाला मार लागला. त्यांचे भांडण सोडविण्याकरिता त्यांचा चुलत भाउ मनोज गावडे आला तेव्हा त्याला सुध्दा शिवीगाळ करून ढकलढोप केले व मारण्याची धमकी दिली त्याच दिवशी दि.१७.१०.२०२२ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता दरम्यान झालेल्या वादाच्या कारणावरून आरोपी मंगेश हा त्याचा चुलत भाउ मनोज याचे घरी हातात काठी धरून आला व मनोज घरी असतांना आरोपी मंगेश म्हणाला की, तु सकाळी आमचे भांडणाचे मधात का पडलास म्हणुन सकाळच्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करून हातातील काठीने त्याचे डोक्यावर उजव्या पायाचे मांडीवर व पाठीवर मारून दुखापत केली. भांडणाच्यावेळी नामे अशोक भिमा कलमोटी, मंगु दोगे गावडे हे हजर होते. त्यांनी भांडण सोडवीले. मी माझी तोंडी रिपोर्ट देत आहे.

३. पोलीस ठाणे अंमलदाराने सदर फिर्यादावरून अपराध क्र.१५/२०२२ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ४५२ भा.दं.वि. कलमान्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा. अशोक बन्शी मेंन्ढे यांनी दाखल केला.

४. मी दि.१८.०९.२०२३ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१६ वर दोष निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. त्यानी गुन्हा कबूल न करता न्याय चौकशी सामोरे जाणे पसंत केले. त्यांच्याविरुध्द पुरावा नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवण्यात आले नाही.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दि.१७.१०.२०२२ रोजी १०.०० ते ०५.०० वाजताच्या सुमारास मौजे कचलेर, ता. अहेरी येथे आरोपीने फिर्यादी नामे रामजी देवू गावडे याला गालावर थापड मारून पाठीमागुन ढकलुन दिले व फिर्यादीचा चुलत भाउ नामे मनोज रैनु गावडे याला काठीने डोक्यावर उजव्या पायाचे मांडीवर व पाठीवर मारून दुखापत पोचविली आणि त्यामुळे आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२४ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नाही. |
| २. | वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, आरोपीने मनोज रैनु गावडे याला डोक्यावर, पायाचे मांडीवर व पाठीवर इच्छापुर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२३ अन्वये अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | वरिल दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादी नामे रामजी देवू गावडे व फिर्यादीचा चुलत भाउ नामे मनोज रैनु गावडे सार्वजनिक शांतता भंग करण्यास उद्युक्त करण्याच्या उद्देशाने जाणुनबुजून अपमान केला होता आणि त्यामुळे आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नाही. |
| ४. | वरिल दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा करून तिला जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्यामुळे आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०६ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५. | वरिल दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या चुलतभाउ मनोज गावडे यांचेवर जबरदस्ती व दुखापत करण्याची पुर्व तयारी करून गृहअतिक्रमण करण्याच्या उददेशाने त्याचे घरात बेकायदेशिर प्रवेश केला आणि त्यामुळे आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४५२ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नाही. |
| ६. | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी फक्त एकच साक्षीदाराची साक्ष नोंदवली. तपशील खालीलप्रमाणे:

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदारांचे नावे | पुराव्याचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | रामजी देवु गावडे | फिर्यादी | २२ |

**मुद्दा क्र.१ करिताः**

७. सदर मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्याने ते मी एकत्रीतरित्या निर्धारणासाठी घेतले आहे. दि.१७.१०.२०२२ रोजी संध्याकाळी १०.०० ते ०५.०० वाजताच्या सुमारास कचलेर, तह. अहेरी, जिल्हा, गडचिरोली येथे आरोपीने फिर्यादीच्या चुलत भावाला नामे मनोज गावडे याला काठीने जे मृत्यूला कारणीभूत ठरू शकते, स्वेच्छेने दुखापत पोहचविल्याचे, सार्वजनिक शांतता भंग मारण्याची धमकी दिल्याचे अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी साक्षीदार सा.क्र.१ रामजी देवू गावडे याच्या सरतपासात असे कथन केले की, तो आरोपीला ओळखते व आरोपी हा त्याचा मामा आहे. घटनेला अंदाजे तिन वर्ष

होत आहे. घटना कचलेर येथे सकाळी ०९.०० ते १०.०० वाजता घडली. आरोपीने त्यांना पैसे देणे होते. त्यावेळी आरोपीने त्यांना पैसे मागीतले होते. परंतु त्यावेळी पैसे नसल्यामुळे ते देवू शकले नाही. त्यामुळे आरोपी व त्यांच्यात बाचाबाची झाली. आरोपीने त्याला ढकलुन दिले. त्यामुळे तो खाली पडला व त्याच्या उजव्या पायाच्या टोंगळयाला मार लागला. त्यानंतर त्याचदिवशी आरोपी त्याच्या घरी आला पुन्हा आरोपीसोबत बाचाबाची झाली. त्या बाचाबाचीमध्ये खाली पडले व त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन पेरमिली येथे तोंडी रिपोर्ट दिली होती. परंतु त्यातील मजकुर त्याला माहित नाही. साक्षीदार अभियोग पक्षाचे समर्थन करित नसल्याने सरकारी वकीलांनी उत्तर सुचक प्रश्न विचारले असता आरोपीने सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आणि त्यांच्यामध्ये व आरोपीत न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्यामुळे तिला प्रकरण पुढे चालवायचे नाही. त्यामुळे त्यांचेमध्ये काही वाद राहिलेला नाही असे मान्य केले.

१०. अभियोगपक्षाला संधी देवुन देखील त्यांनी तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदवली नाही.

११. सहा.सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

१२. अभिलेखावरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त दोन साक्षीदार फिर्यादीला तपासले. फिर्यादीने आरोपीविरूध्द काही सांगितले नाही. तसेच सदर प्रकरणात वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. अभिलेखावरून असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपीमध्ये तडजोड झाली असल्याने फिर्यादीने आरोपीविरुध्द साक्ष दिली नाही परंतु

कारण काहीही असो अभिलेखावर पुरावा आणण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे, परंतु ती जबाबदारी अभियोगपक्ष पार पाडण्यात अपयशी ठरला आहे. एकंदरीत वर चर्चा केल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला असे माझे मत आहे. परिणामतः पुराव्याअभावी, मी मुददा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करिताः**

१४. उपरोक्त चर्चेनुसार मुद्दे क्र.१ चे कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द केला नसल्याने, आरोपीला सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त करणेचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. तपासी अधिकारी भाग ड प्रमाणे विटेचा तुकडा जप्त केला आहे. तो मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करावा असा आदेश पारित करणे न्यायोचित होईल. पुढे असे की, सदर प्रकरणात फिर्यादी फितुर झाल्याने माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[1] मध्ये दिलेल्या निर्देशाची अनुपालन करण्याची आवश्यकता नाही. म्हणुन, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. आरोपी **मंगेश पोटी मडावी** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ व ४५२ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जुने जामिनपत्र रद्द करुन जामिनदारास मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– प्रत्येकी जामीन दाखल करावा.

1 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे

४. सदर प्रकरणातील **भाग ड** करण्यात प्रमाणे जप्त करण्यात आलेली विटेचा तुकडा मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.02 16:34:41 +0530

(एस.एम.एच.शाहिद)
दि.०२.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी